श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

वर्ष-७, अंक-१२ | डिसेंबर-२०१९ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८

## श्रीसद्गुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे जयंती उत्सव



पुणे येथे श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिरात श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती तथा श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे यांचा १३६वा जयंती दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. दि. १० नोव्हेंबर ते १३ नोव्हेंबर २०१९ या कालावधीत अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते आणि त्याला भक्तगणांचा प्रतिसाद अत्यंत उत्साहपूर्ण होता.

दि. ७ ते १० नोव्हेंबर या काळात सकाळी ह.भ.प. नंदकुमार कर्वे, ह.भ.प. वासुदेवबुवा बुरसे आणि ह.भ.प. संदीप मांडके यांची कीर्तने आणि सायंकाळी सौ. हर्षदा जोशी आणि आचार्य पद्मनाभ व्यास यांची प्रवचने यांचे आयोजन करण्यात आले होते.

# सोमवार दि. ११ नोव्हेंबर २०१९; कार्तिक शु.१४, शक १९४१

दि. ११ नोव्हें. रोजी सकाळी ध्वजपूजनाने उत्सवाच्या मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. सामुदायिक नामस्मरण, सामुदायिक उपासना, उपनिषद पठण, लघुरुद्राभिषेक, आचार्य पद्मनाभ व्यास यांचे प्रवचन, महाप्रसाद, दुपारी ह.भ.प. सौ. सुनिती केळकर यांचे कीर्तन आदी कार्यक्रमानंतर सायंकाळी पाठांतर स्पर्धा पारितोषिक आणि पाठशाळेच्या परीक्षांचे प्रमाणपत्र वितरण तसेच विद्वज्जनांचा सत्कार यासाठी एका समारंभाचे आयोजन केलेले होते.

# पारितोषिक आणि प्रमाणपत्र वितरण तसेच विद्वज्जनांचा सत्कार समारंभ

भक्तगणांच्या आणि पाठशाळेतील विद्यार्थ्यांच्या मोठ्या उपस्थितीत झालेल्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी दिल्लीच्या पं. वेंपती कुटुंबशास्त्री यांना निमंत्रित केलेले होते. त्यांचा परिचय करून देताना सूत्र संचालक श्री. विवेक सरस्वते यांनी सांगितले की मा. अध्यक्षांनी वेदांत, न्याय, साहित्य आदी विषयांचे सखोल अध्ययन केले असून त्यांनी संपूर्णानंद विद्यापीठ, राष्ट्रीय संस्कृत संस्थान तसेच पाँडिचेरी विद्यापीठाचे कुलगुरूपद भुषविलेले आहे. आंतरराष्ट्रीय संस्कृत अध्यापन संस्थेचे ते अध्यक्ष असून त्यांनी अनेक विद्वत् परिषदांचे अध्यक्षपद भूषविलेले आहे. राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित पं. कुटुंब शास्त्री यांनी पन्नासहून अधिक पुस्तके लिहिली आहेत.



*डावीकडून - वे.मू. नारायण घनपाठी, श्री. विकासराव वालावलकर, पं. वेंपती कुटुंबशास्त्री, श्री. अशोकराव जोशी, डॉ. श्री. संदीप शर्मा आणि विनायकराव पराडकर*



*वे.मू. नारायण घनपाठी यांचा सत्कार*

मा. अध्यक्षांनी पद ग्रहण केल्यावर संस्थेचे मुख्य विश्वस्त श्री. अशोकराव जोशी यांनी त्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

श्री. धनंजय मिराशी यांनी पाठांतर स्पर्धेच्या निमित्ताने आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले, ''आजचे आपले ज्ञानसंचित हे पाठांतरातूनच जपलेले आहे. हजारो वर्षांपासून ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पाठांतराद्वारे सोपविण्यात आले. स्वा. सावरकरांनी अंदमानच्या तुरुंगात रचलेली काव्यसंपदा मुखोद्गत करूनच जपली आणि बाहेर आणली. गणितासारख्या विषयातही सूत्रांच्या पाठांतराने मोठी मदत होते असे रँ. परांजपे यांनी सांगितले आहे. लहानपणी या पाठांतर स्पर्धेसाठी पाठ केलेला गीतेचा अध्याय मी सांगलीला गेलो असता श्रीसंत दादामहाराज केळकर यांच्यासमोर म्हटला तेव्हा त्यांनी माझे कौतुक केले आणि श्रीकाकांनाही कळविले. म्हणजे पाठांतरामुळे सद्गुरूंचाही आशीर्वाद मिळतो असे म्हणता येईल! पुढच्या पिढीला पाठांतराची गोडी लावण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे.''

वाराणसीचे वे. मू. नारायणशास्त्री घनपाठी (कृष्ण यजुर्वेद) यांनी आपल्या संप्रदायाप्रमाणे ससूत्र, सलक्षण घनपाठ व तैत्तिरीय शाखेचे अध्ययन केले असून सध्या ते वाराणसी येथे श्री विश्वेश्वराच्या अनुग्रहात वास्तव्य करीत आहेत. त्यांचा अध्यक्षांच्या हस्ते 'वेद कलानिधी' हे बिरुद, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि महादक्षिणा रु. ५१, ०००/- तसेच मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना वे. मू. नारायणशास्त्री म्हणाले, ''वेद हे ज्ञानाचे भांडार आहे. या संस्थेने वेदाच्या संवर्धनासाठी अनेक



डॉ. श्री. संदीप शर्मा सत्काराला उत्तर देताना



'करविती गुरू ते ते असे होत' - पुस्तक प्रकाशन समारंभ



चि. ईशान सुरेंद्र मालवणकर पाठांतर स्पर्धेचे पारितोषिक स्वीकारताना



वेदपरीक्षेतील यशस्वी विद्यार्थी ओंकार जोशी प्रमाणपत्र स्वीकारताना

उपक्रम चालविले आहेत. वेदाच्या उत्कर्षासाठी, उन्नतीसाठी या संस्थेने चालविलेल्या कार्याला माझ्या शुभेच्छा!''

महामहोपाध्याय श्री देवदत्तशास्त्री पाटील गुरुजींकडे न्यायादिशास्त्रांचे अध्ययन केलेले विद्वत्प्रवर श्री. संदीप शर्मा सध्या उज्जयिनी येथे विद्यार्थ्यांना न्यायादिशास्त्रांचे अध्यापन करीत आहेत. त्यांना 'शास्त्र कलानिधी' हे बिरुद, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि महादक्षिणा रु. ५१, ०००/- तसेच मानपत्र देऊन अध्यक्षांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. आपल्या सत्काराला उत्तर देताना डॉ. शर्मा म्हणाले की नाना विद्या, नाना कला, प्रचंड ग्रंथसंपदा, पूर्वजांचे परिश्रम यांनी संपन्न झालेल्या या भारतभूमीत जन्म मिळणे हे भाग्य आहे. त्याच बरोबर संतांचे मार्गदर्शन मिळणे, आपल्या धर्माचे पालन करणे आणि मोक्षमार्गावर वाटचाल करणे हा वेदांनी सांगितलेला उत्कृष्ट मार्ग आहे. त्यासाठी वेदाध्ययन आवश्यक आहे. आपण मला बोलावून सन्मानित केलेत ही सद्गुरूंची कृपा आणि माझे भाग्य आहे. अशा सत्कारातून वेदाध्ययनाला प्रेरणा मिळेल. या सत्काराबद्दल मी अत्यंत आभारी आहे.

श्रीसहजानंदसरस्वती स्वामी महाराज यांच्या महानिर्वाणानंतर संस्थेच्या गत तीस वर्षातील कार्याविषयी माहिती देणाऱ्या; 'करविती गुरू तें तें असे होत' (१९८९-२०१९) या श्री. विजय पुरुषोत्तम जोशी लिखित ग्रंथाचा प्रकाशन समारंभ मा. अध्यक्षांनी केल्यावर संस्थेने घेतलेल्या पाठांतर स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. त्यानंतर श्रीवासुदेवानंतसरस्वती वेदपाठशाळेने घेतलेल्या वेदपरीक्षांमधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अध्यक्षांच्या हस्ते प्रमाणपत्रे देण्यात आली.

यानंतर पं. वेंपती कुटुंबशास्त्री आपले अध्यक्षीय भाषण करताना म्हणाले, '' वेदासारखे तत्व आपला भारतदेश सोडल्यास या विश्वात अन्यत्र कोठेही नाही. कौटिल्याने असे सांगितले आहे की वेद हे धर्म आणि अधर्माचे प्रमाणरूप आहे. धर्म आणि अधर्माचे स्वरूप म्हणजेच संस्कृतीचे स्वरूप होय! विश्वातील प्राचीनतम अक्षरोद्गार, स्वरोद्गार वेदाच्या स्वरूपातच आहे. त्या काळापासून आजपर्यंत त्यात यत्किंचित बदल झालेला नाही. वेदांचे जतन, संवर्धन अत्यंत त्यागपूर्वक जीवन अंगिकारून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे,

गुरूकडून शिष्याकडे असे होत आले आहे. असे दुसरे उदाहरण जगात अन्यत्र कोठेही नाही. याचा आपणाला अभिमान वाटला पाहिजे.

''वेदातील कोणतेही वचन अथवा विचार घ्या. वेदात केवळ द्विपदांसाठीच नाहीतर चतुष्पादांच्या कल्याणासाठी प्रार्थना आहेत. अशी प्रार्थना करणारा समाज केवढ्या उंचीवर पोहोचलेला असेल? आज आपण मी, माझे कुटुंब, माझे राष्ट्र अशा संकुचित विचारात अडकलो आहोत, पण वेदात असा एकही संकुचित विचार नाही. ज्या समाजाचे आपण वारस आहोत तो समाज किती समन्वित, संतुलित विचारांचा आणि आध्यात्मिक, विशाल दृष्टिकोनाचा अंगिकार केलेला असेल? आपणासाठी हे अत्यंत अभिमानास्पद आहे.

''जगाच्या कानाकोपऱ्यातील उत्तमोत्तम विचार मला अवगत व्हावेत अशी वेदात प्रार्थना आहे. आज आपण दुसऱ्यांच्या विचाराबद्दल एवढे सहिष्णू राहिलो आहोत का?

''अभ्युदय आणि नि:श्रेयस यांचा समतोल वेदांनी राखला आहे. वेदांसाठी प्राणार्पण करण्याची आपली परंपरा आहे. आज या परंपरेला सर्वात जास्त प्रमाणात आव्हान निर्माण झाले आहे. आणि या परंपरेचे दायित्व वेदाध्ययन करणाऱ्या, माझ्या समोर बसलेल्या तुमच्या सारख्या मुलांवर आहे.

''आज सगळीकडेच प्रदुषण वाढत आहे. तसेच ते वेदाध्ययनातही वाढत आहे. वैदिक परंपरा, वैदिक उच्चररणाची शुद्धता यांचे संरक्षण, संवर्धन करणे आवश्यक झाले आहे. वेदविद्या आणि संस्कृत भाषा हे आपले एकमेव आणि अमुल्य संचित आहे. ते अन्य कोणालाही लाभलेले नाही. म्हणून त्याचे संरक्षण करणे आपले परम कर्तव्य आहे.'' या समारंभाला निमंत्रित केल्याबद्दल आभार मानून, संस्थेला शुभेच्छा देऊन त्यांनी आपले भाषण संपविले. श्री. अनिल लिमये यांनी आभार मानल्यावर 'वरयाचनापठणा'ने कार्यक्रमाची सांगता झाली.

सोमवारच्या या कार्यक्रमाला साडेसहाशे ते सातशे भक्तगण उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर 'तुलसी विवाह पारंपरिक पद्धतीने, उत्साहाने आणि थाटामाटात साजरा करण्यात आला.



*पं. वेंपती कुटुंबशास्त्री आपले विचार व्यक्त करताना*



*तुलसी विवाह*

## मंगळवार दि. १२ नोव्हेंबर २०१९; कार्तिक पौर्णिमा, शक १९४१
## श्रीबाबामहाराज सहस्त्रबुद्धे जयंती दिन

श्रीबाबामहाराजांचा जयंती उत्सव श्रीमहाराजांनी प्रस्थापित केलेल्या परंपरेप्रमाणे अत्यंत भक्तिभावाने साजरा झाला. सकाळी भक्तगणांचे सामुदायिक नामस्मरण, सामुदायिक उपासना, उपनिषद पठण, लघुरुद्राभिषेक, आचार्य पद्मनाभ व्यास यांचे प्रवचन आदी कार्यक्रमानंतर ह.भ.प. श्री. सदानंद विष्णू ताम्हनकर यांनी श्रीबाबांच्या मंदिरात जन्मोत्सवाचे कीर्तन केले. जन्मोत्सवाचा सोहळा अत्यंत भक्तिभावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. त्यानंतर महाप्रसाद झाला. जन्मोत्सव सोहळ्यासाठी सुमारे बाराशे लोक सहभागी झाले होते

सायंकाळी 'श्रीं'ची रथातून समाधिमंदिराभोवती पालखी प्रदक्षिणा काढण्यात आली. शेकडो भक्तगणांनी अत्यंत उत्साहाने नाचत, भजन करीत या सोहळ्यात भाग घेतला. भगिनीवर्गही मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. त्रिपूर पूजन सायंकाळी ७.०० वाजता करण्यात आले.




प्रवचनकार प.पू. पद्मनाभ व्यास



जन्मोत्सवाचे कीर्तन – ह. भ. प. सदानंद ताम्हनकर



श्रीबाबामहाराजांची जन्मोत्सव सोहळ्यासाठीची चांदीची प्रतिमा(मुखवटा)



श्रीबाबामहाराजांच्या प्रतिमेवर फुले वाहतांना भक्तगण – जन्मघटीचा क्षण



श्रीबाबामहाराजांच्या प्रतिमेला मांगलिक स्नान, अत्तर विलेपन, वस्त्रे आदी सोपस्कार करताना श्री. सुधाकर काजरेकर



*बालमूर्तीला पाळण्यात घालून झोके देताना भगिनीवर्ग; डावीकडून - सौ. ऋचा काजरेकर, सौ. विद्या खरे, सौ. शिल्पा पराडकर, सौ. मुक्ता वालावलकर आणि सौ. मयुरी फडके*





*जन्मोत्सवासाठी आलेले भक्तगण*



*पालखी प्रदक्षिणा - आघाडी चले रामराजा । पिछाडी संतनकी फौजा ।।*



*''नाचती आनंद कल्लोळी । पवित्र गाणें नामावळी रे ।।*
*खेळ मांडियेला वाळवंटीघाई । नाचतेए वैष्णव भाई रे ।।''*

# बुधवार दि. १३ नोव्हेंबर २०१९; कार्तिक वद्य १, शक १९४१
# डॉ. श्रीपाद बाणावली यांच्या सत्काराचा सोहळा




*डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. बाणावली, श्री. विकासराव वालावलकर, आणि श्री. विनायकराव पराडकर*

सकाळी भक्तगणांचे सामुदायिक नामस्मरण, सामुदायिक उपासना, उपनिषद पठण, लघुरुद्राभिषेक, आचार्य पद्मनाभ व्यास यांचे प्रवचन, महाप्रसाद आदी कार्यक्रमानंतर सायंकाळी डॉ. श्रीपाद बाणावली यांच्या सत्काराचा सोहळा आयोजित करण्यात आला होता.

डॉ. श्रीपाद बाणावली हे बालवयापासून वडिलांसोबत मंदिरात येणारे श्रीमहाराजांचे भक्त. श्रीमहाराजांच्या कृपादृष्टीखाली लहानाचे मोठे झाले. आपल्या ऋजू आणि निगर्वी आणि परोपकारी स्वभावामुळे मंदिराच्या परिवारात अत्यंत प्रिय व्यक्तिमत्व. साहजिकच त्यांच्या सत्काराच्यावेळी सभागृह पूर्ण भरून गेले होते. डॉक्टरांचा परिचय करून देण्यासाठी डेरवण हॉस्पिटलच्या वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील मुद्दाम डेरवणहून येऊन जातीने उपस्थित होत्या. शांतीसूक्ताने सत्कारसमारंभाला सुरुवात झाल्यावर डॉ. बाणावली यांचा परिचय करून देताना डॉ. सुवर्णा पाटील म्हणाल्या, ''सदगुरू बाबामहाराजांच्या जयंती निमित्त विद्वानांचा सत्कार करण्याचा एक समारंभ प्रतिवर्षी होत असतो. बाबामहाराज स्वतः विद्वान तर होतेच पण आत्मज्ञानीही होते. तेव्हा त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून विद्वानांचा सत्कार करणे हे अगदी उचित आहे. आज डॉ. बाणावली ह्यांच्या सत्कार आपण करणार आहोत. ज्ञानाचं भांरभार ओझं जमवलं म्हणजे माणूस विद्वान होत नाही. त्या ज्ञानाचा योग्य ठिकाणी योग्य वेळी वापर करता आला तर त्यांची विद्वत्ता दिसून येते.

''ते सदगुरू दिगंबरदास महाराजांचे सखखे शिष्य आहेत. आणि म्हणूनच एकदा मेडिसिन मध्ये डिग्री घेतल्यावर महाराज,'तू लहान मलांचा डॉक्टर होणार आहेस. देश विदेशातून तुझ्याकडे उपचारासाठी मुलं येतील. असं त्यांना म्हणाले. सदगुरूंची आज्ञा शिसावंद्य मानून पुन्हा त्यांनी नवीन विषयाच्या अभ्यासाला सुरुवात केली. त्यात डिग्री संपादन केली. कॅन्सरवर उपचार करू लागले.

''अमेरिकेत छान कार्य चालू होतं पण सदगुरू म्हणाले की आता तू गोरगरिबांचा डॉक्टर हो म्हणून ते पुन्हा भारतात परत आले व टाटा हॉस्पिटमध्ये रूजू झाले. ही गोष्ट साधी व सोपी नव्हती. पण सदगुरूंवरील श्रध्दा व निष्ठा ह्यामूळे त्यांनी दुसऱ्या कोणत्याच गोष्टीचा विचार केला नाही. तारे स्वयंप्रकाशी असतात. म्हणून स्थिर असतात. ग्रह मात्र परप्रकाशी असून सारखे फिरत राहतात. डॉक्टर एक चमकता तारा आहेत म्हणूनच टाटामध्ये स्थिर राहून ते कार्य करीत आहेत.

''अमूल्य हिरा रत्नपारखीच ओळखू शकतो. सरकार दरबारी हिऱ्याची पारख होत नाही. कारण तसे रत्नपारखीच तिथे नाहीत. ते रत्न महाराजच ओळखू शकतात. दिगंबरदास महाराजांनी हिऱ्यांना पैलू पाडले. आणि श्रीकाकामहाराजांनी त्यांची पारख केली.

'रविश्चन्द्रो घना वृक्षाः नदी गावश्च सज्जनाः । एते परोपकाराय लोके देवेन निर्मिताः।। '

ह्या सुभाषितात म्हटल्यापमाणे सूर्य, चंद्र, वृक्ष, गाय, सज्जन हे देवाने फक्त परोपकारासाठी निर्माण केले आहेत त्याचप्रमाणे डॉक्टरनाही परोपकारासाठीच देवाने जणू निर्मिले आहे.'नमन्ति फलिनो वृक्षाः। नमन्ति गुणिनो जनाः।।' फळानी भरलेल्या वृक्षांना व गुणी जनांना लोक नमन करतात. तसेच बाणावली सरांच्या गुणांमुळेच त्यांना वंदन करणारे अनंत पेशंट आहेत. कॅन्सरमुळे रुग्ण जीवनाची लढाई आधीच हरतो. पण डॉक्टर त्याला लढायला व जिंकायला शिकवतात.

''दुःखाचा डोंगर कोसळलेली एक आई पदर पसरत आशेने आपल्या लहान मुलाला घेऊन डॉक्टरांकडे येते. मुलाला रक्ताचा कॅन्सर झालेला असतो. डॉक्टर बाळाला उचलून घेतात, चॉकलेट देतात, आर्थिक मदतीची सोय करतात व आईला आत्मविश्वास देतात व उपचार सुरू करतात. एवढच नाही तर पालकांना राहायची, येण्याजाण्याची पण सोय करतात व नोकरी पण मिळते. यासाठी अनेक सामाजिक संस्थाशी त्यांनी सांगड घातली आहे.

''काही वर्षानी एक वयस्कर स्त्री सरांना भेटायला येते व आपल्या मुलाच्या लग्नाचे निमंत्रण द्यायला ती आलेली असते. ती आई तीच असते व तिचा मुलगा पूर्ण बरा होऊन बोहल्यावर चढल्याचा आनंद सरांसोबत द्विगुणीत करायला ती येते.

''असाच एक मुलगा रक्ताच्या कर्करोगाने पीडित, उपचारासाठी सरांचे नाव ऐकून ट्रिटमेंटला येतो आणि आश्चर्य म्हणजे काही वर्षानी हाच मुलगा सरांच्या विभागातच मेडिकल ऑन्कोलॉजीस्ट, कन्सर तज्ज्ञ डॉक्टर म्हणून रूजू होतो!

''महाराजांनी डॉक्टरांना 'गरीबांचा डॉक्टर हो!' असा आशीर्वाद दिला होता. त्यांचीच जाण ठेवून सरांनी अतिशय स्वस्त, सर्वसामान्यांना परवडेल अशा, तोंडावाटे घेता येईल अशा 'मेट्रोनॉमिक किमोथेरपी' चा शोध लावला. या केमोथेरपीमुळे 'सॉलिड ट्युमर'चा गनिमी काव्याने नाश केला जातो. 'सॉलिड ट्युमर'चा रक्तपुरवठा खंडीत केल्याने आजार बरा होतो व कॅन्सर हा मधुमेहासारखाा जुनाट आजार आहे असे वाटते व मृत्यूची भिती कमी होण्यात ह्याचा मोलचा वाटा आहे. जगभरात त्यांची प्रचंड प्रशंसा झाली व गरिबांची आयुष्ये वाढायला मदत झाली.

''त्याचे संशोधनाचे विषय- Study of oncogenesis, study of hematopoietic progenitor cells, molecular genetics हे असून त्यांचे बाराशे पेक्षा जास्त संशोधनपर निबंध प्रकाशित झाले आहेत. उच्चविद्याविभुषित असूनही सामाजिक भान असलेल्या डॉक्टरांनी ग्रामीण भागात म्हणजे डेरवण येथे वालावलकर रुग्णालयात गेली २४ वर्षे दर महिना आपली सेवा देऊन कॅन्सरवर एक सर्वंकष उपचार करणारे केंद्र उभे केले आहे आणि गोरगरिबांना त्यांच्या दारात उपचार सुरू झाले. त्यांची गणना आदर्श संशोधक व रुग्णांसाठी तळमळ असणारे डॉक्टर म्हणूनच होईल. ते जसे चांगले डॉक्टर आहेत तसेच चांगले 'ॲथलेट' आहेत. कॉलेजचे मैदान त्यांनी गाजवलेले आहे.

M.D. Medicine (Mumbai ) Jr. Res. Asso. Hemato oncology, (Cincinati Medical centre,Ohio), Ped. Hemato oncologist (Memphis, Tennessee) अशी त्यांची गुणवत्ता आहे. Director of Academics and Prof. Medical and ped Oncology,Tata Memorial Center, या पदावर ते कार्यरत आहेत. अनेक संस्थांमध्ये विविध मानद पदांवर ते कार्यरत आहेत.

1) Gov. of Maharashtra Honorary oncologist of his Excellency, The Governer of Maharashtra
2) India Pedeatric Oncology
3) Ics, Homi Bhabha National institute, Impact foundation, Drug advisory committee
4) SAC of Malabar Centre and BKLW Hospital
5) Member of metronomic global health, ICMR DHR

त्यांना अनेक संस्थांनी विविध प्रकारे सन्मानित केलेले आहे.-

1) Child hood cancer Oration
2) Lokamat Maharashtrian of the Year Award 2019
3) Excellence in Healthcare
4) Nominated for "Mumbai Heroes 2017"




*डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. बाणावली यांचा परिचय करून देताना*

5) Sevavrati award from Nana Palkar smruti pratisthan
6) Society of Hematologic Oncology, USA
7) Distinguished Doctor Award
8) Barton Kamen Prize for metronomic research in children
9) Dr. P. R. Dange Memorial Oration IAP
10) RV Lokeshwar Memorial Oration
11) Winner of the Most patient centric health care professional
12) Impacct foundation award
13) Certficate of recognition by societyof hemato-oncologist USA

'अज्ञेभ्यो ग्रन्थिनः श्रेष्ठा गन्थिभ्यो धारिणो वराः। धारिभ्यो ज्ञानिनः श्रेष्ठा ज्ञानिभ्यो व्यवसायिनः।।' अडाण्यापेक्षा ग्रंथ जवळ असणारा (लिहायला, वाचायला शिकलेला) श्रेष्ठ होय. ग्रंथाची धारणा (विषयांचे स्मरण) असण्यापेक्षा ज्ञानी (त्या त्या विषयांचा अनुभव असलेला) श्रेष्ठ होय. आणि ज्ञान्यापेक्षा उद्योगी(ते ज्ञान व्यवहारात आणणारा श्रेष्ठ होय) अशा डॉ.बाणावलींचा सत्कार संस्थेतर्फे करावा अशी विनंती मी विकास वालावलकरांना करते.''

डॉ. सुवर्णा पाटील यांच्यानंतर प्रमुख वक्ते श्री. विकासराव वालावलकर आपले विचार व्यक्त करण्यासाठी उभे राहिले. डॉ. बाणावलींचा सत्कार का करावयाचा आहे हे मला थोडक्यात सांगता येणार नाही अशी प्रस्तावना करून श्री. विकासराव म्हणाले,''उत्तम डॉक्टरच्या अंगी जे जे गुण असावेत असे आपणाला वाटते त्या सर्व गुणांचा समुच्चय डॉ. बाणावलींच्या ठायी आहे. त्यांनी आपल्या विषयाचे एवढे सखोल अध्ययन केले आहे की केवळ तेवढ्यासाठी त्यांचा सत्कार करणे योग्य ठरेल. त्यांनी 'क्लिनिकल रिसर्च'बरोबर सेंट ज्युड हॉस्पिटलमध्ये आठ वर्षे 'लॅब रिसर्च'ही केला आहे. सर्वांनाच अशी संधी मिळत नाही. डॉक्टरांना अशी संधी मिळाली आणि त्यांनी त्या संधीचे सोने केले. आपले ज्ञान त्यांनी जगभर व्याख्याने देऊन मुक्तहस्ताने वाटले आहे.

''चांगल्या डॉक्टरची प्रवृत्ती थोडीफार आध्यात्मिक असली पाहिजे असे माझे मत आहे. जरी शरीरशास्त्राचे अद्ययावत ज्ञान त्याला असले तरी शरीर शेवटी ईश्वरी शक्तीने चालते!

''श्रीकाकांच्या आज्ञेनुसार ते अमेरिकेतील संपन्न जीवन सोडून, तेथील चांगल्या पगाराची नोकरी, बंगला, गाडीसारखी भौतीक सुखे सोडून भारतात परत आले आणि येथे टाटा मेमोरिअल सेंटरमध्ये अत्यंत कमी पगारावर आणि सामान्य पदावर रुजू झाले. हा निर्णय अजिबात सोपा नव्हता. हा बदल पचविणे सोपे नव्हते. परंतु त्यांच्या आध्यात्मिक वृत्तीमुळे त्यांनी हे आनंदाने केले.

''ते दिवसाला दोन-दोनशे पेशंट तपासतात. एवढे कष्ट घेण्यामागे पेशंटविषयी वाटणारी आस्था, कणव हीच प्रमुख आहे. आम्ही कधी टाटाला गेलो, तर तिथल्या वातावरणाचे, तेथील पेशंट्स पाहून दडपण येते. डॉक्टर मात्र दिवसभर सर्वांशी सुहास्य, आश्वासक मुद्रेने बोलत असतात. त्यांचे पेशंट म्हणजे लहान मुले, त्यांना ते चॉकोलेट देतात, पालकांशी बोलून त्यांना धीर देतात, या जिव्हाळ्यानेच पेशंट अर्धा बरा होतो. डॉक्टरांच्या आत्मविश्वासपूर्वक बोलण्याने पेशंटला धीर येतो. हा त्यांचा स्थायी भाव आहे. ही शिकवून येणारी गोष्ट नव्हे! हा त्यांचा सगळ्यात मोठा गुण आहे.

''हल्ली आपल्या लहान सहान समाजसेवेचे सोशल मिडियावर मोठे अवडंबर माजविले जाते. डॉक्टर गेली बावीस वर्षे महिन्यातून एकदा शनिवार, रविवारी मुंबईहून डेरवणला जाऊन पेशंट तपासत आहेत. यात परदेशी दौऱ्यावर असतील तेवढा काळ सोडल्यास कधीही खंड पडलेला नाही. त्यातही पुन्हा या पेशंट्सच्या 'फॉलो-अप'साठी ते जीवाचे रान करीत असतात. जर पेशंटने ट्रीटमेंट पूर्ण केली नाही तर तिचा उपयोग होत नाही म्हणून डॉक्टर सतत या गोष्टीचा पाठपुरावा करीत असतात. येथील गोरगरिब जनतेला परवडेल अशी 'मेट्रॉनॉमिक किमोथेरपी' त्यानी उपयोगात आणली आहेच. गरज पडल्यास पेशंटला मुंबईच्या धर्मादाय संस्थांकडून आर्थिक मदत मिळावी म्हणून ते प्रयत्न करीत असतात. या अशा सेवावृत्तीचा आपण गौरव करीत आहोत.

''कॅन्सरचे प्रमाण जगभरच मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या ट्रीटमेंटचा खर्च हा अवाढव्य आहे. सर्वसामान्यांना तो परवडत नाही. 'मेट्रॉनॉमिक किमोथेरपी' ही अल्पखर्चाची ट्रीटमेंट आहे. तिचे ते जनक आहेत. डेरवणला त्यांनी ती प्रथम उपयोगात आणली. गेली बावीस वर्षे व्यवस्थित रेकॉर्ड ठेवून तिची उपयुक्तता त्यांनी सिद्ध केली आहे. आता टाटामध्येही ही प्रणाली वापरायला परवानगी मिळाली आहे. आणि डॉक्टर आता जगभर तिचा प्रसार करीत आहेत. टाटामध्ये या विषयावर जागतिक परिषद झाली, तिचे निमंत्रक डॉ. बाणावलीच होते. या थेरपीला 'नेक्स्ट जनरेशन टार्गेटेड' थेरपी असे म्हणतात. या थेरपीच्या दूरदृष्टीच्या प्रणेत्याचा हा सत्कार आहे!

''कॅन्सरवरील उपचाराच्या केमोथेरपी, रेडिएशन थेरपी आणि सर्जरी अशा तीन पद्धती आहेत. बहुतेक डॉक्टर्स ज्या पद्धतीचे स्पेशॅलिस्ट असतात त्या पद्धतीने उपचार करतात. डॉ. बाणावली या तीनही पद्धतींचा समन्वय करून, अन्य डॉक्टरांशी चर्चा करून पेशंटला जास्तीतजास्त उत्तम ट्रीटमेंट मिळेल असे पाहतात. यातून त्यांची निरहंकारी वृत्ती दिसून येते. या वृत्तीचा हा सत्कार आहे!

''अमेरिकेतून परत आल्यावर त्यांना असिस्टंट प्रोफेसर या पदावर आपल्या करिअरची सुरुवात करावी लागली. आज ते टाटामध्ये डायरेक्टर बोर्डावर आहेत. आशियातील सर्वात मोठ्या अशा या संस्थेत हा बहुमान केवळ चार, पाच लोकांना मिळतो.

''डॉक्टर 'वर्कोहोलिक'आहेत. सुट्टीच्या दिवशीसुद्धा ते हॉस्पिटलमध्येच असतात. पेशंट्सना तपासणे, त्यांना दिलासा देणे, मदत करणे या त्यांच्या आनंदाच्या गोष्टी आहेत. त्यांच्या पत्नी उल्कावहिनी यांची त्यांना मनापासून साथ असल्यामुळेच एवढा वेळ ते रुग्णसेवेला देऊ शकतात. अमेरिकेतून परत येणे हा निर्णय साधासोपा नव्हता. उल्का वहिनींनी तो आनंदाने स्वीकारल्यामुळे सगळे शक्य झाले.

''उल्कावहिनी स्वत: 'आहारतज्ज्ञ' आहेत. निर्मल निकेतन आणि 'एसएनडीटी' मध्ये त्यांनी अनेक वर्षे काम केले आहे. आता त्या डॉक्टरांबरोबर डेरवणला येतात. आपल्या ज्ञानाचा, अनुभवाचा फायदा तेथे आपल्या पॅरामेडिकल स्टाफला लेक्चर्स देऊन करतात. आपल्या पोषण आहार मोहिमेत त्यांचा सहभाग आहेच! त्यांनाही मी ट्रस्टतर्फे धन्यवाद देतो!

मुंबईला 'एमडी मेडिसिन' केल्यावर श्रीमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे डॉक्टरांनी अमेरिकेत जाऊन 'पेडिॲट्रिक ऑन्कॉलॉजी'मध्ये पुन्हा 'एमडी' केले. त्यांना तेथे ताबडतोब प्रवेश मिळणे हा एक चमत्कारच आहे. कारण तेथे जागा रिकामी असणे आणि ती परदेशातील माणसाला मिळणे असे सहसा होत नाही. पण डॉक्टरांची गुणवत्ता आणि पाठीमागे असलेले श्रीमहाराजांचे आशीर्वाद यामुळेच हे शक्य झाले.

''डेरवणच्या कॅन्सर विभागाची जबाबदारी सर्वस्वी त्यांनी उचलली आहे आणि सगळे श्रेयही त्यांनाच आहे. टाटा मेमोरिअल सेंटरबरोबर संबंध प्रस्थापित होणे त्यांच्यामुळेच शक्य झाले. 'रुरल आउटरीच प्रॉग्रॅम' द्वारे रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या दोन जिल्ह्यातील २२६० गावात दोन लक्ष लोकांची कॅन्सरसाठी तपासणी करण्यात आली. सुमारे १०,००० लोकांना मोफत औषधोपचार करण्यात आले. कोकणातील लोकांना आता उपचारासाठी मुंबईला जावे लागत नाही. शिवाय डॉक्टर अनेक धर्मादाय संस्थांकडून गरीब रुग्णांना आर्थिक मदत मिळावी म्हणूनही ते सतत प्रयत्नशील असतात. या सगळ्याचे श्रेय नि:संशय त्यांचेच आहे.''

डॉ. बाणावलींना आणि उल्का वहिनींना शुभेच्छा देऊन, तसेच त्यांच्या 'मेट्रॉनॉमिक किमोथेरपी'चा प्रसार जगभर व्हावा अशी इच्छा प्रदर्शित करून श्री. विकासरावांनी आपले भाषण संपवले. त्यानंतर डॉ. सुवर्णा पाटील यांनी मानपत्राचे वाचन केले आणि श्री. विकासराव यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, मानपत्र आणि रु. एक लाख देऊन डॉक्टर बाणावली यांचा सत्कार केला. सत्काराचा औपचारिक विधी झाल्याबरोबर क्षणाचाही विलंब न लावता डॉक्टर



*श्री. विकासराव वालावलकर आपले विचार व्यक्त करताना*

व्यासपीठावरून खाली उतरले आणि श्रीकाकांना ते बसले होते तेथे जाऊन विनम्रपणे नमस्कार केला. त्यांच्या या विनम्र भावाला प्रेक्षकांनी टाळ्यांच्या उत्स्फूर्त गजरात दाद दिली.

सत्काराला उत्तर देण्यासाठी अगदी भरलेल्या अंत:करणाने उभे राहिलेल्या डॉक्टरांनी श्रीमहाराजांचे स्मरण करून बोलायला सुरुवात केली आणि ते म्हणाले, '' मी काय करायचे आणि काय नाही हे श्रीमहाराजांनीच ठरवले. आत्ता 'डायरेक्टर'पोस्ट मिळाल्याचा उल्लेख झाला. खरे तर अशी काही पोस्ट रिकामी नव्हती. एकदा श्रीकाकांनी विचारले की डायरेक्टर होण्याची काही शक्यता आहे का? आणि पुढे चार महिन्यातच जागा रिकामी झाली. मला ती देण्यात आली!

''मी फक्त प्रयत्न करीत राहिलो. माझ्या हातून जे काही झाले ते सगळे श्रीमहाराजांच्या कृपेमुळे आणि त्यांच्या आशीर्वादाने!

''अमेरिकेत मी पाहिले की तेथे ८०/९० टक्के मुले कॅन्सरच्या आजारातून बरी व्हायची. आपल्या देशात मी पाहिले की येथे ५०/६० टक्के मुलांची ट्रीटमेंट आर्थिक अडचणींमुळे अर्धवटच राहते. ट्रीटमेंट करताना नाईलाजाने मुलांना परत घरी पाठवायला लागते आणि याचे फारच वाईट वाटते. मग हळूहळू मदत मिळत गेली. सुरुवातीला मी मुलांना तपासताना ती रडली वगैरे, तर देण्यासाठी खिशातून चॉकोलेट्स नेत असे. मग सगळ्याच मुलांना ती देऊ लागलो. पण गंमत म्हणजे ती कधी कमी पडली नाहीत! सहकारी विचारायचे की किती चॉकोलेट्स आणतोस? पण खरेच सांगतो, ती कधीच कमी पडली नाहीत! कधी कधी पेशंटचे नातेवाईक कृतज्ञ भावनेने मला काही भेट देऊ पाहतात, मी त्यांना सांगतो की मुलांना वाटायला चॉकोलेट्स द्या. आता कधीकधी राजगिऱ्याची चिक्की वगैरे देतो पण कधी कमी पडत नाही!

''इंपॅक्ट फाउंडेशन ही संस्था टाटामध्ये आम्ही स्थापन केली

आहे. गतवर्षी सेवाभावी संस्थांकडून ३५ कोटी रुपये मिळाले. टाटामध्ये जवळजवळ ३००० मुले ट्रीटमेंटसाठी येतात. एखाद्याजवळ एक रुपयाही नसतो. पण आम्ही त्याला परत पाठवत नाही. राहण्याजेवणाची सोय केली जाते. दररोज ५०० मुलांना दुपारचे जेवण, सायंकाळी अल्पोपहार दिला जातो.

''आत्ता आमच्याकडे फक्त ६० बेड्स आहेत. त्यावर एवढ्या ३००० पेशंट्सची व्यवस्था करताना फारच कसरत करावी लागते. पण तरीही ९५ टक्के पेशंट्स आता ट्रीटमेंट पूर्ण करतात. १०० बेड्सचे नवीन सेंटर आता सुरू होत आहे. आफ्रिका खंडातील अनेक देशातून, बांगलादेशातून अनेक पेशंट्स येतात. त्या देशातील डॉक्टर्स, पॅरामेडिकल स्टाफला आम्ही ट्रेनिंग देतो.

''मेट्रॉनॉमिक किमोथेरपीची प्रेरणा श्रीमहाराजांचीच आहे. छत्रपती श्रीशिवाजी महाराज हे श्रीमहाराजांचे आदर्श! 'गनिमी कावा' हा श्रीशिवाजी महाराजांचा शोध आहे. लाखोंच्या शत्रुसैन्यावर ते मोजके मावळे घेऊन हल्ला करायचे आणि विजय मिळवायचे! 'मेट्रॉनॉमिक किमोथेरपी' त्याच पद्धतीने काम करते. मला हे सगळे टाटामध्ये नव्हे तर डेरवणला सुचले! म्हणजे हे माझे नव्हे तर श्री महाराजांचे आहे, त्यांच्या आशीर्वादचे फळ आहे!

''कॅन्सर ट्रीटमेंटमध्ये कॅन्सरच्या पेशी नष्ट करण्याचा आपण प्रयत्न करतो. पण शरीराची प्रतिकारशक्ती कमी झाल्यामुळे आणि त्या पेशींना पोषक वातावरण मिळाल्यामुळे त्या पुन्हा वाढतात. कॅन्सरवर विजय मिळवायचा तर पेशंटची प्रतिकारशक्ती वाढवायची आणि पेशींच्या वाढीसाठी पोषक ठरणारे वातावरण नष्ट करायचे आणि मग त्या नष्ट करायच्या उपाययोजना करायच्या. या तिन्ही गोष्टींचा एकत्रित परिणाम होऊन कॅन्सरची वाढ रोखली जाते. हा गनिमी कावा! कमीत कमी सैन्यानिशी, कमीतकमी पैशात, त्याचे दाणापाणी बंद करून त्याला मारणे, हा गनिमी कावा!

''हे परदेशी लोकांना सांगून समजणार नाही. यात महाराजांचा किती वाटा आहे हे तुम्हाला समजावे म्हणून मी हे सांगितले. या थेरपीसाठी अनेक वेगवेगळी कॉम्बिनेशन्स करावी लागतात. आम्ही केलेल्या प्रत्येक कॉम्बिनेशनचा फायदा झाला ही श्रीमहाराजांची कृपा.

''डेरवणला हॉस्पिटल आणि मेडिकल कॉलेज चालवणे सोपे नव्हे! पण ते श्रीमहाराजांच्या कृपेमुळे व्यवस्थित सुरू आहे. 'मेट्रॉनॉमिक किमोथेरपी'सुद्धा श्रीमहाराजांच्या कृपेमुळे यशस्वी होत आहे. महाराजांना गरिबांसाठी कार्य करायचे होते. कॅन्सरचे उपचार एवढे महाग आहेत की काही जणांना आपले घरदार विकावे लागते. ती वेळ त्यांच्यावर येऊ नये, त्यांचा आत्मसन्मान शाबूत राहावा म्हणूनच हे प्रयत्न आहेत.''

''हे कार्य करण्यासाठी बळ देणारी श्रीमहाराजांची कृपा आपल्यावर सदैव राहू दे, असेच रुग्णसेवेचे काम निरंतर आपल्या हातून घडू दे आणि माझी निष्ठा आपणावर सदैव राहू दे, आपली सेवा माझ्याकडून सदैव घडू दे, मला अहंकाराचा स्पर्श न होऊ दे!''अशी श्रीमहाराजांच्या चरणी प्रार्थना करून त्यांनी आपले भाषण संपवले. आभार प्रदर्शन आणि वरयाचनापठणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

पहाटे सुमारे साडेअकराशे लोकांच्या उपस्थितीत झालेल्या लळीताच्या कीर्तनाने आणि प्रसादवाटपाने उत्सवाची सांगता झाली आणि जड अंत:करणाने भक्तगण आपापल्या घरी परतले.



*सत्काराला उत्तर देताना डॉ. श्रीपाद बाणावली*

# भ.क.ल.वालावलकर रुग्णालयातर्फे बालदिन साजरा



*चिपळूण येथे आरोग्य केंद्रामध्ये बालदिन समारंभ*

१४ नोव्हेंबर रोजी बालदिनाच्या निमित्ताने भ.क.ल. वालावलकर रुग्णालयाच्या चिपळूण येथे आरोग्य केंद्रामध्ये ० ते ६ वयोगटातील मुलांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा लाभ चिपळूणमधील मतेवाडी व करंबवणे येथील ३० मुलांनी घेतला. या सर्व मुलांच्या तपासण्या बालरोग तज्ज्ञांकडून करण्यात आल्या. स्वच्छता, आहार व लसीकरणाचे महत्त्व या विषयी माहिती देण्यात आली.

# पी.एच.सी. कर्मचारी परिचारिकांसाठी प्रशिक्षण शिबिर



*डॉ. अमेय ओक मार्गदर्शन करताना*

महाराष्ट्र सरकार(आरोग्य सेवा संचालनालय)यांच्यामार्फत पी.एच. सी. कर्मचारी परिचारिकांसाठी गर्भाशयाच्या कर्करोगाच्या तपासणीसाठी व्ही.आय.ए./विली या तंत्राचे प्रशिक्षण गुरुवार दि. १४ नोव्हेंबर ते रविवार दि. २४ नोव्हेंबरपर्यंत भ.क.ल. वालावलकर रुग्णालयात आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यशाळेसाठी पालघरवरून १६ परिचारिका सहभागी झाल्या. तसेच Prevention Department of Tata Memorial Hospital, Mumbai येथून आलेल्या डॉ. अमेय ओक, डॉ. प्रतिभा पाटील, परिचारिका सौ. रूपा भावसार, सौ. दर्शना राणे व सामाजिक कायकर्ते श्री. अशोक पाटील यांनी व्याख्यान व रुग्णांवर प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले.

# डॉ. फुलरेणू चौहान यांची भेट




*डॉ. फुलरेणू चौहान यांची रुग्णालयाला भेट*

डेरवणमध्ये भ.क.ल. वालावलकर रुग्णालयात सध्या सुरू झालेल्या मठत्रढ्ढढ/ऊर्शीीरप उेर्हीींफ प्रकल्प अंतर्गत कोंकण भागातील किशोरवयीन मुलींची आरोग्य व बुद्धिमत्तामापन चाचणी केली जाते. या प्रकल्पाला शनिवार दि. १६ नोव्हबर रोजी डॉ. फुलरेणू चौहान यांनी भेट दिली व प्रकल्पातील कर्मचाऱ्यांना 'आहार व आहारातील घटक' या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले तसेच आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. चौहान या हिंदुजा हेल्थकेअर सर्जिकल, खार-मुंबई येथे कार्यरत असून त्यांना संशोधन आणि उपचार क्षेत्रातील २५ वर्षांचा अनुभव आहे. मधुमेहपीडित मुलांसाठी त्या एक खास दवाखाना चालवितात. त्या हिंदुजा हॉस्पिटलमध्ये डी.एन.बी. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात.

# किशोरवयीन मुलींसाठी मार्गदर्शन शिबिर





*किशोरवयीन मुलींसाठी आरोग्य सेवा*

सुधा व्ही. कुलकर्णी, अवेश्रशीलशपीं केश्रळींळल उरीश उशर्पीश, यमाई फॅशन प्रायव्हेट लिमिटेड, कोलकाता यांच्या संयुक्त विद्यमाने भ.क.ल. वालावलकर रुग्णालयात रत्नागिरी जिल्ह्यातील किशोरवयीन मुलींसाठी आरोग्य सेवा देत आहेत. या प्रकल्पांतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातील विविध भागातील मुलींसाठी पाच दिवसांचे निवास शिबिराचे नियोजन केले जाते. यात प्रवास, त्यांची राहण्याची जेवणाची सोय केली जाते. तसेच त्यांच्या विविध पॅथॉलॉजिकल तपासण्या, सोनोग्रफी, तनिता बॉडी कांपोझिशन केले जाते. पाच दिवसांच्या या निवासी शिबिरात किशोरवयात होणारे शारीरिक व मानसिक बदल, मासिक पाळी दरम्यान घ्यायची काळजी, करिअर निवड अशा वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन केले जाते, तसेच बुद्धिमत्ता मापन चाचणी केली जाते. त्यांची शिवसमर्थ गड तसेच ड्रिम हेल्थ पार्कला भेट आयोजित केली जाते आणि सहभागी मुलींना सहभागाचे प्रमाणपत्र आणि भेट वस्तूंचे वाटपही केले जाते.

# राज्यस्तरीय कॅरम स्पर्धेत मुंबई विभागाचे वर्चस्व




*राज्यस्तरीय कॅरम स्पर्धा – उद्घाटन समारंभ*

क्रीडा व युवक सेवा संचालनालयांतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा क्रीडा परिषद, रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने 'एसव्हीजेसीटी' क्रीडा संकुलात शालेय राज्यस्तरीय कॅरम स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. महाराष्ट्रातील आठ विभागातून आलेल्या १४/१७/१९ वर्षाखालील १६० मुलींनी या स्पर्धेत आपले कौशल्य पणाला लावले.

स्पर्धेच्या उद्घाटनासाठी रत्नागिरी पोलीस वाद्यवृंद पथक आले होते. मान्यवरांच्या समोर त्यांच्या तालबद्ध सुरावटीवर खेळाडूंचे संचलन पार पडले. स्वागतगीत आणि दीप प्रज्वलन यानंतर स्पर्धेचे उद्घाटन क्रीडा उपसंचालक डॉ चंद्रशेखर साखरे यांच्या हस्ते झाले. यावेळी उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी नवनाथ ढवळे, विभागीय वन अधिकारी रमाकांत भवर, गटविकास अधिकारी पंचायत समिती चिपळूण सरिता पवार, क्रीडा अधिकारी किरण बोरवडेकर, राज्य कॅरम संघटनेचे सहसचिव योगेश फणसाळकर, मिलिंद साप्ते यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. या क्रीडा संकुलातील उर्जा नवोदित खेळाडूंना नेहमीच पुढील यशाकडे नेत राहील असे मत साखरे यांनी व्यक्त केले. हे क्रीडा संकुल ग्रामीण खेळाडूंसाठी कायमच खुले असते त्यामुळे आता ग्रामीण भागातील खेळाडूना हक्काचे क्रीडांगण मिळाले यासाठी संस्थेचे मानावेत तितके आभार कमीच आहेत अशा भावना रत्नागिरीचे क्रीडा अधिकारी बोरवडेकर यांनी व्यक्त केल्या.

मुंबई, कोल्हापूर, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, लातूर या विभागातून आलेल्या खेळाडूंनी दर्जेदार खेळाचे प्रदर्शन केले. त्यामध्ये मुंबई विभागाचे वर्चस्व राहिले. कोल्हापूर विभागाचे नेतृत्व करताना रत्नागिरी जिल्ह्याच्या आकांक्षा कदमने तिसरा तर ईशा खैरे हिने सहावा क्रमांक पटकावला.



*व्यासपीठावर डावीकडून– सरिता पवार, रमाकांत भवर, नवनाथ ढवळे, प्रवीण पवार, डॉ. चंद्रशेखर साखरे, प्रदीप भाटकर*


*अटीतटीचा सामना*

## भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र

श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com



**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

### पुणे व मुंबई येथून नोव्हेंबर २०१९ मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रक

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| दर शनिवारी | डॉ. सुनील नाडकर्णी, पुणे (एम.एस.ऑर्थो.) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| ०१ डिसें.ते ०८ डिसें. | जर्मन युरोलोजिस्ट डॉक्टर्स टीम | मुत्रमार्ग आणि मुतखडे यावरील शस्त्रक्रीया |
| ०१ डिसें. | डॉ. श्वेता केळकर, बालरोगतज्ज्ञ | लहान मुलांच्या मोतीबिंदूवर उपचार |
| ०४ डिसें. | डॉ. सतेज सबनिस, युरॉलॉजिस्ट, मुंबइ | मुतखड्यावरील दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया |
| ०८ नोव्हें. | डॉ. मंदार अक्कलकोटकर (आयुर्वेदिक), पुणे | तपासणी व आयुर्वेदिक उपचार |
| १४ डिसें. | डॉ. सुजाता नाईक, मुंबई (होमिओपॅथीक) | त्वचारोग तज्ज्ञ |
| १४ डिसें. | श्रवण यंत्र व वाचा उच्चार तज्ज्ञ | श्रवण यंत्र व वाचा उपचार |
| २१ डिसें. | टाटा हॉस्पिटल डॉक्टर्स, मुंबई | कर्करोग शस्त्रक्रिया व उपचार |
| २१ डिसें. | डॉ. श्रीपाद बाणावली, मुंबई (कर्करोग तज्ज्ञ) | कर्करोग तपासणी व उपचार |
| २१ डिसें. | डॉ. आनंद जोशी, (गॅस्ट्रोएंट्रोलॉजीस्ट), मुंबई | पचनसंस्थेवरील तपासणी व उपचार |
| -- डिसें. | डॉ. संजय ओक, मुंबई (सर्जन) | लहान मुलांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया |
| -- डिसें. | डॉ. अमीत साहू (एम.डी.रेडिऑलॉजीस्ट ), मुंबई | इंटरव्हेंशनल रेडिऑलॉजी तपासणी व उपचार |
| -- डिसें. | डॉ. के. एस. कुलकर्णी, पुणे | (मानसोपचार तज्ज्ञ) मानसोपचार |
| -- डिसें. | डॉ. अच्युत जोशी, पुणे (नेफ्रोलॉजिस्ट) | किडनी विकार |

**१) डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.०० वाजेपर्यंत UHTC चिपळूण व त्यानंतर वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.**
**२) श्रवण यंत्र (बहिरेपणाचे मशीन) व वाचा ऊच्चार तज्ञ (स्पीच थेरपीस्ट) दर महीन्याच्या दुसऱ्या शनिवारी वालावलकर रुग्णालयात भेटतील**

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. । Visit us at https://swamisamarth.com/dervan/
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५, **संपादक मंडळ :** सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०